# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05 / 07 / 2023 (बुधवार) सायंकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील वाकोडी शिवार येथे दिनांक ०३/०७/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०४/०७/२०२३ चे ११.०० वा. सुमारास यातील वाकोडी शिवारातील वाकोडी ते टाकळी रोड भागातील ट्रान्सफार्मर जवळील श्री. शांताराम खोरगडे, अविनाश खोरगडे, नंदु तराळे वरील सर्व रा. वाकोडी यांच्या शेतातील लघुदाब वाहीनी ही खांबा वरून एकुण १७ गाळातील अंदाजे ०३.७५ किमी लांबीचा अंदाजे ५५०००/– रू किंमतीचा अॅल्युमीनीयम तार अज्ञात आरोपीतांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रशांत पुरूषोत्तमराव शेटे, वय ४७ वर्ष, रा. खापा सहायक अभियंता महावितरण खापा ना. ग्रा. यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार विकास बेलसरे पोस्टे खापा मो. नं. ९३०९७४१०९५ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक ०४/०७/२०२३ चे १०.३० वा. ते १०.४५ वा. दरम्यान यातील आरोपी नामे– यश बाबुलाल दुरुगकर, वय १९ वर्ष, रा. पहीलेपार ता सावनेर याने फिर्यादी ही कॉलेज मधून घरी जात असताना मोटरसायकलने तिचा जवळ येवून पूढे जात येत होता तसेच पिडीतेशी मैत्री व लग्न तसेच तिच्याशी बोलावे म्हणुन तिच्याकडे एकटक पाहुन तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होऊन तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड) ५०६ भादवी , सहकलम ८, १२ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण अधिनियम २०१२ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अतूल खोडनकर ब. नं. १७९१ पोस्टे सावनेर मो. नं. ९१५८९७३७५० हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. उमरेड :–** दिनांक ०३/०७/२०२३ चे ०६.०० वा. ते ०६.३० वा. सुमारास पो.स्टे. उमरेड हद्दीत फिर्यादीला सकाळी ०६:०० वा. झोपुन उठल्यावर तिची मुलगी वय १३ वर्ष हि घरी दिसुन आली नाही तेव्हा फिर्यादिला वाटले कि ती कुठे तरी गेली असेल असे समजुन कामावर निघुन गेली. फिर्यादी परत ०६:०० वा. आली असता ती पुन: घरी दिसुन आली नाही. फिर्यादीने आजुबाजुला शोध घेतला असता समजले कि गावातील मुलगा वय अंदाजे १४ वर्ष हा घरी नव्हता म्हणुन फिर्यादीची मुलगी व गावातील मुलगा यांचा दोघांचा गावात व नातेवाइकांकडे शोध घेतला मिळुन आले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खोटोले पोस्टे उमरेड हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत खरसोली येथे दिनांक ०४/०७/२०२३ चे २२.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– रमाबाई उर्फ रामोली पांडयाजी सलामे रा. खरसोली ता. नरखेड व तिचा पती हे दुसऱ्या ठिकाणी राहात असलेले मुलाकडे रात्री रोडने जात असताना पाठीमागुन मोटरसायकलवर अनिल सलामे व विजय सलामे रा. दोन्ही खरसोली ता. नरखेड हे दारू पिवुन आले व शिवीगाळ केली तसेच फिर्यादीला व तिच्या पतिला वेळवाच्या काठीने पाठीवर व छातीवर मारले व फिर्यादीला कपाळावर व ओठावर मारले तसेच अनिल सलामे याने हातबुक्क्याने मारले त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातुन व ओठातुन रक्त निघत निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कोडापे हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**